# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**6 JULY, 2018**

[Time : 09-00]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - I**

**(Time Allowed : 1 Hour)**

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - १**

(वेळ : १ तास)

---

**प्र.1)** पुढील पत्र आकर्षक मांडणी करून टंकलिखित करा : **[गुण : ३०]**

**आझाद टेक्सटाईल्स**

सुभाष नगर,

कोल्हापूर

जा. क्र. : आटचा/ दिनांक : २५ एप्रिल, २०१४

रेमंड वुलन हाऊस,

कॅम्प, पुणे-१

संदर्भ : आपले पत्र क्र. रवुहा/२१/२०१४, दिनांक १४ एप्रिल, २०१४चे पत्र

महोदय,

आपले वर नमूद केलेले पत्र मिळाले. त्याबद्‌ल धन्यवाद.

आम्ही आपले लक्ष काही विशेष मुद्‌दयांकडे वेधू इच्छितो. आमच्या इथे तयार होणारा माल आम्ही वेगवेगळ्या कापड गिरण्यांमधून विकत घेतो. वर सदर कापड गिरण्या आम्हाला फक्त साडे दहा टक्के सवलतीने माल पुरवितात. त्यामुळे आपल्या पत्रातून आपण जी विनंती केली आहे. आपल्याला जी आम्ही व्यापारी सूट देऊ केली आहे ती अत्यंत कमी असून आपणास साडे आठ टक्के सूट अपेक्षित आहे. त्या विनंतीचा योग्य मान राखून आम्ही फक्त साडेसहा टक्के सूट देऊ शकतो. आपणास माहित आहेच की आम्हाला मिळणारे कापड पहिल्या प्रतीचे असते व एकंदर सर्व महागाईचा विचार करता आम्ही देऊ केलेले दर वाजवी आहेत.

तसेच आपण सुचिवले आहे की आपणास माल दीर्घ मुदतीच्या उधारीवर देण्यात यावा ते ही अशक्य आहे. फक्त तुमचे आमचे संबंध लक्षात घेऊन आम्ही बिल चुकते करण्याची मुदत केवळ आपल्याकरिता ३५ दिवसांऐवजी ४५ दिवसांची देऊ.

कळावे,

आपला विश्वासू,

आझाद टेक्स्टाईल्स

सोबत : काही नाही.

**प्र.2)** खालील तक्ता टंकलिखित करा. रकान्यांच्या ओळी टंकलेखन यंत्रवार अथवा शाईने आखा. दर्शकबिंदू दर्शवा. [गुण : ३०]

**संतोष मेडिकल स्टोअर्स**

**निरनिराळ्या औषधांच्या विक्रीचा तपशील**

| अनु. क्रमांक | तपशील | एप्रिल | मे | जून |
|---|---|---|---|---|
| १. | आयोडेक्स .. | २,९८७ | २,८९६ | २,९६५ |
| २. | व्हिक्स .. | २,८९७ | २,९८७ | २,९८९ |
| ३. | कैलास जीवन .. | २,८७६ | २,६७८ | २,९७६ |
| ४. | झंडू बाम .. | १,९८७ | १,९७६ | १,६८९ |
| ५. | अमृत मलम .. | ९८७ | ९६५ | ९८९ |
| ६. | पिडानाशक .. | ८७६ | ८६५ | ८९३ |
| ७. | क्रॅक क्रिम .. | १,४३२ | १,३२१ | १,४७८ |
| ८. | अमृतांजन .. | १,८९७ | १,८५६ | १,९९५ |